# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक क्र. आस्था / आर.ओ. / १८ / २०२५

या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरामधील कोणत्याही शैक्षणिक / प्रशासकीय विभागामध्ये कोणतेही कार्यक्रम अयोजित करण्याकरिता प्रशासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

करिता, मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभाग प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, यापुढे आपल्या विभागात कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे असल्यास सदर कार्यक्रमाचे विस्तृत विवरण, कार्यक्रम पत्रिका, वक्ते, प्रमुख पाहूणे इत्यादीबाबतच्या तपशिलासह प्रशासकीय मान्यतेकरिता टिपणी / पत्र कार्यक्रम दिनांकाच्या किमान एक आठवडा अगोदर सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात यावेत. याबाबत प्रशासनाची परवानगी मिळाल्यानंतरच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, तसेच विनापरवानगी कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येवू नये.

सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभाग प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाची नोंद घेण्यात येवून त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

विद्यापीठ परिसर, )(
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४ )(
संदर्भ क्र. :- आस्था/आर.ओ./१८/२०२५ )(
दिनांक :- ०४-०८-२०२५ )(

**कुलसचिव**

***********

**या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव;**

०१) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख

०२) संचालक, युनिर्व्हसिटी नेटवर्क ॲण्ड माहिती केंद्र (युनिक)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.